राज्यातील सर्वसाधारण वर्गवारीतील कृषीपंप अर्जदारांना "कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०" अंतर्गत वीज जोडणी देण्याकरीता येणाऱ्या खर्चाकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना द्यावयाचे अर्थसहाय्य (समायोजनाने) सन २०२३-२४ (लेखाशिर्ष-४८०१४०९५)

**महाराष्ट्र शासन**
**ऊद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क.१२१ (भाग-२)/ऊर्जा-५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : - ३१ जानेवारी, २०२४

<u>संदर्भ</u> :-

१) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क.१२१ /ऊर्जा-५, दि.१८.१२.२०२०
२) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क.१२१ /ऊर्जा-५, दि.१७.०३.२०२२
३) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क.१२१ /ऊर्जा-५, दि.२१.०३.२०२३
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.१२/०४/२०२३.
५) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क.१२१ (भाग-२) /ऊर्जा-५, दि.११.०९.२०२३
६) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क.१२१ (भाग-२) /ऊर्जा-५, दि.१३.०९.२०२३

<u>प्रस्तावना</u> :-

शासन निर्णय दि.१८.१२.२०२० अन्वये राज्यात महावितरण कंपनीमार्फत "कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०" राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने शासन निर्णय दि.१७.०३.२०२२ नुसार प्रत्येक वर्षी योजना कालावधीत घेण्यात येणाऱ्या रू. १५०० कोटी पर्यंतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे. शासन निर्णय दि.२१.०३.२०२३ अन्वये सन २०२२-२३ या वर्षाकरिताच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून महावितरण कंपनीस रू. ३४९.४१ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे. त्यामधून नवीन वीज जोडणीकरिता पायाभुत सुविधा उभारण्यात आल्या आहेत.

२. शासन निर्णय दि.११.०९.२०२३ अन्वये सन २०२३-२४ या वर्षाकरिताच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सन २०२३-२४ या वर्षाकरिता सर्वसाधारण वर्गवारीतील सुमारे ४०,२७२ प्रलंबित कृषीपंप अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे वीज जोडणी देण्याकरिता येणारा खर्च सुमारे रू.१३८७.७७ कोटी भागभांडवल स्वरूपात महावितरण कंपनीस देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

३. सन २०२३-२४ या वर्षाकरीता लेखाशिर्ष क्र.४८०१४०९५ अंतर्गत रु.१००० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतूदीपैकी शासन निर्णय क्र.६ अन्वये रु.२०० कोटी इतका निधी वित्त विभागाच्या मान्यतेने महावितरण कंपनीस रोखीने वितरीत करण्यात आला

आहे. आता वित्त विभागाच्या संदर्भिय शासन निर्णय क्र.४ मधील सुचनांच्या अनुषंगाने व वित्त विभागाने अनुमती दिल्यानुसार रक्कम रु.८०० कोटी इतका निधी महावितरण कंपनीला समायोजनाने वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

राज्यातील सर्वसाधारण वर्गवारीतील कृषीपंप अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे वीज जोडणी देण्याकरीता येणाऱ्या खर्चाकरीता सन २०२३-२४ करिता अर्थसंकल्पित केलेल्या रु. १०००.०० कोटी रक्कमेपैकी **रु. ८०० कोटी (रुपये आठशे कोटी फक्त)** रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना समायोजनाने वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

२. उक्त प्रयोजनासाठी होणारा "मागणी क्रमांक के-११, ४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च, ०५ पारेषण व वितरण, १९०, सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका, (०१)भांडवली गुंतवणूक, (०१) (०१) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनीमध्ये भांडवली गुंतवणूक (महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनीमध्ये भांडवली गुंतवणूक) (कार्यक्रम) ५४ गुंतवणूका लेखाशिर्ष क्र.४८०१४०९५" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो सन २०२३-२४ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. समायोजनाने वितरीत करावयाची रक्कम **रु. ८०० कोटी (रुपये आठशे कोटी फक्त)** महावितरण कंपनीस रोख न देता पुढे दर्शविल्याप्रमाणे महावितरण कंपनी मर्या., यांच्याकडून शासनास येणे असलेल्या रक्कमेपोटी वसूल करण्यात यावी व खाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली समायोजनाव्दारे जमा करण्यात यावी.

| अ. क्र. | तपशील | रक्कम रुपये | जमा लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १) | वित्तीय वर्ष २०२३-२४ या वर्षातील विद्युत शुल्कापोटी या आदेशान्वये समायोजित करावयाची रक्कम (अंदाजित एप्रिल,२०२३ ते सप्टेंबर,२०२३)<br>(९७८,५१,००,०००-८००,००,००,०००/- =१७८,५१,००,०००बाकी) | ८००,००,००,०००/- | ००४३ वीजेवरील कर व शुल्क १०१ वीजेचा वापर व विक्री यावरील कर (०१) (०१) मुंबई विद्युत शुल्क अधिनियम १९५८ खालील जमा रक्कमा (००४३००९२) |
| | **एकूण** | ८००,००,००,०००/- | |

४. वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यास नियंत्रण अधिकारी म्हणून श्री.ना.श्री.कराड,उपसचिव (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत असून आहरण व संवितरण अधिकारी म्हणून डॉ.गौरी पाटील, कार्यासन अधिकारी, (ऊर्जा-३) यांनी सदर रक्कमेचे पुस्तकी समायोजन करण्याची कार्यवाही करावी.

५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२ मुंबई/नागपूर यांनी त्यांच्या अखत्यारित व अधिकारात वरील विवरणपत्रानुसार सदर रक्कम **रु. ८०० कोटी (रुपये आठशे कोटी फक्त)** चे पुस्तकी समायोजन करुन तसे शासनास कळवावे.

६. शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२३/ प्र.क्र.४०/ अर्थ-३, दि.१२/०४/२०२३ च्या परिपत्रकातील सोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ९ मधील अटीची पूर्तता होत आहे. तसेच अनुक्रमांक १ ते ८ मधील अटीं लागू होत नसल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

७. या लेखाशिर्षाखाली निधी वितरित करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या देयकाच्या अनुषंगाने प्रमाणित करण्यात येते की, या लेखाशिर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही तसेच उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. विनि/शिकाना/५१४, दि.१८/१२/२०२३ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार सदर निधी समायोजनाने वितरित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२४०१३११४४७१२८५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NARAYAN SHRIKRISHNA KARAD

Digitally signed by NARAYAN SHRIKRISHNA KARAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT,
2.5.4.20=fc35aa8ffade5bb6105200693c60a32b755f7e67f72965b8dd57adaa570981f1, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=AE7FAEABAF4571C2748E4DD5FFD2CD108DE0E130859970F4D7D0EE40046B3E9E, cn=NARAYAN SHRIKRISHNA KARAD
Date: 2024.01.31 14:48:14 +05'30'

**( ना. श्री. कराड )**
**शासनाचे उप सचिव**

**प्रत:-**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. उपमुख्यमंत्री (ऊर्जा),यांचे सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), यांचे सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
५) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२.
७) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव (वित्त) मंत्रालय, मुंबई-३२.
९) अपर मुख्य सचिव (नियोजन) मंत्रालय, मुंबई-३२.
१०) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी, फोर्ट, मुंबई.
१२) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१.
१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
१४) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
१५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
१६) अधिदान व लेखा अधिकारी (अराप/रालेवि-१), मुंबई.
१७) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
१८) उप सचिव,(अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१९) कक्ष अधिकारी (रोख), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२०) निवड नस्ती (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.